॥ डाव मांडून भांडून मोडूं नको ॥

गायकः सुधीर फडके
गीतः ना. घ. देशपांडे
संगीतः राम फाटक

डाव मांडून भांडून मोडूं नको ॥ धृ. ॥

आणलें तूं तुझें सर्व, मी आणलें,
सर्व कांहीं मनासारखें मांडलें,
तूंच सारें तुझे दूर ओढूं नको ॥ १ ॥

सोडले मीं तुझ्याभोवती सर्व गे,
चंद्रज्योतीरसाचे रुपेरी फुगे,
फुंकरीनें फुगा, हाय, फोडूं नको ॥ २ ॥

गोकुळींचा सखा तूंच केलें मला,
कौतुकानें मला हार तूं घातला,
हार हांसून घालून तोडूं नको ॥ ३ ॥

काढलें मी तुझें नांव, तूं देखिलें,
आणि माझें पुढें नांव तूं रेखिलें,
तूंच वाचून लाजून खोडूं नको ॥ ४ ॥